पत्र समूह संस्थापक : स्व. श्री रामगोपाल माहेश्वरी

# नवराष्ट्र

नवभारत पत्रसमूहाचे मराठी वृत्तपत्र

सदैव आपल्या वाचकांसोबत

e-paper : navarashtra.com ❖ मुंबई, गुरुवार, ७ नोव्हेंबर २०१९, कार्तिक शुक्ल १० ❖ पाने : १४ मूल्य : रु. ४.००

## बॉम्बे आर्ट सोसायटीत पालघरमधील संस्कृतीदर्शन

### रिचा अग्रवाल यांच्या चित्रांचे प्रदर्शन

**मुंबई :** प्रसिद्ध चित्रकार रिचा अग्रवाल यांच्या चित्रांचे प्रदर्शन ९ नोव्हेंबरपासून वांद्रे येथील बॉम्बे आर्ट सोसायटी येथे भरणार आहे. पालघर जिल्ह्यातील आदिवासी जीवनाचा अनुभव रिचा यांनी चित्रकलाकृतीतून रेखाटला आहे. ९ ते ११ नोव्हेंबर दरम्यान स. ११ ते सायं. ७ पर्यंत ही चित्रे कलारसिकांना विनामूल्य पाहता येतील. यानिमित्ताने समता आर्ट इनिशिएटिव्ह हा नवीन उपक्रमही सुरू करण्यात येणार आहे.आदिवासी जीवनाबद्दल आपण नेहमीच ऐकत किंवा वाचत असतो. मात्र ते जवळून अनुभवण्याची संधी प्रत्येकवेळी मिळतेच असे नाही. मुंबईच्या जवळच असलेला पालघर जिल्हा. यात प्रामुख्याने आदिवासी जीवन दिसते.





या आदिवासी जीवनाचे चित्रण रिचा यांनी केले आहे. पालघर जिल्ह्यातील दुर्गम भागात रिचा यांनी भेट दिली. तेथील स्थानिक महिलांशी संवाद साधला. रोजच्या जगण्यात संघर्ष असूनही आनंदी राहणाऱ्या या महिलांनी रिचा यांना प्रभावित केले. तेथून प्रेरणा घेऊन परतलेल्या रिचा यांनी आपल्या भावना थेट कॅनव्हासवर उतरवल्या.